## चौतिसावा दीक्षांत समारंभ

## दि. २३ फेब्रुवारी २०१८

## मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे प्रास्ताविकपर भाषण

नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चौतिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. व्ही. एन. मोरे, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व पूर्व-कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे पूर्व अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो..

विद्यापीठाच्या चौतिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो आणि आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेल्या प्रमुख अतिथींचा परिचय करून देतो.

आज दीक्षांत समारंभास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. व्ही. एन. मोरे हे आपल्यात उपस्थित आहेत. श्री. व्ही. एन. मोरे हे भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी राहिले असून त्या पदावरून त्यांनी जवळपास वीस वर्षे लोकाभिमुख कार्य केले. त्यांच्या कार्यातील निःपक्षपातीपणा, प्रामाणिकपणा यांचा बहुमान म्हणून त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष पदावर नेमणूक झाली. त्यांचा जन्म दि. १ जून १९५६रोजी झाला. सातान्याच्या शिवाजी महाविद्यालयातून त्यांनी भूगोल या विषयात पदव्युत्तर शिक्षण तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून एम. फिल.चे (नागरी भूगोल) शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर काही काळ त्यांनी भूगोल विषयाचे अध्यापनाचे कार्य केले. १९८४ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून, शासनाच्या सहायक सचिव पदावरून, त्यांनी आपल्या शासकीय सेवेला प्रारंभ केला. १९९४पर्यंत मंत्रालयात विविध जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर १९९५ ते १९९८ या कालावधीत त्यांनी अन्न व नागरी पुरवठा खात्याचे सहायक सचिव म्हणून कार्य केले. शासनाच्या पदावरून काम करत असताना त्यांनी नेहमीच लोकाभिमुख दृष्टिकोन बाळगला. उदा. अन्न व नागरी पुरवठा या खात्यातील पदांवरून त्यांनी केलेली कामे : तीन प्रकारच्या रेशन

कार्डांची अंमलबजावणी, भात आणि मका यांची पहिल्यांदा करण्यात आलेली खरेदी, किमान आधारभूत किंमतीचा वक्तशीर व विनासायास चुकारा, अन्नपूर्णा योजनेचे सुलभीकरण आणि यशस्वी अंमलबजावणी, माध्यान्ह भोजन योजना, तसेच अंत्योदय अन्न योजना यांचे प्रभावी कार्यान्वयन इत्यादी. विक्री कर खात्याचे अतिरिक्त आयुक्त म्हणून काम करताना त्यांनी ३५ प्रमुख धोरणात्मक निर्णय घेतले. आपल्या कठोर निर्णयांनी या खात्यातील कामकाजाला नवी दिशा दिली. परिवहन आयुक्त असताना पाच हजार कोटी रुपयांचा महसूल त्यांनी शासनास मिळवून दिला. २२पैकी १३ सीमावर्ती चेक पोस्टचे त्यांनी आधुनिकीकरण केले. सहा आसनी सहयात्री टॅक्सीला प्रोत्साहन दिले. प्रादेशिक मोटार वाहन कार्यालयांतील विविध व्यवहारांचे आधुनिकीकरण केले. असे लोकहितैषी कार्य करणारे शीस्तशीर प्रशासकीय अधिकारी मा. श्री. व्ही. एन. मोरे यांचे आजच्या मंगलप्रसंगी मी मनःपूर्वक स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे १९८३रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. पुढे सन २००४मध्ये संत गाडगे बाबांचे नाव ह्या विद्यापीठाला देण्यात आले. अगदी स्थापनेपासूनच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करत, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य विद्यापीठाने चालविले आहे. आज **३८२** महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित असून **१३२** महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2(f)/12(B)सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विद्यापीठात विविध महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांतून नऊ विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. यंदाच्या उन्हाळी परीक्षेत ६२५ परीक्षांमधून अंदाजे साडेतीन लक्ष परीक्षार्थी सहभागी होतील. विद्यापीठ परिसरात एकूण २८ शैक्षणिक विभाग असून यावर्षी इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, वाणिज्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा हे विभाग नव्याने सरू करण्यात आलेत. त्यांतून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. याशिवाय आजीवन अध्ययन व विस्तार विभागात ‘समुपदेशन आणि मनोउपचार कौशल्य’ या विषयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रम यावर्षी नव्याने सुरू करण्यात आला. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरतर्फे(नॅकतर्फे) ‘अ’श्रेणी प्राप्त करणारे आपले विद्यापीठ कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कटिबद्ध आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी विद्यापीठ नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तसेच कौशल्यविकासाच्या उपक्रमांवर भर देत गुणवत्तेचे एक एक शिखर गाठत आहे. विद्यापीठाच्या गुणवत्तेचे एक प्रतीक म्हणजेच गुणवत्ता यादीतील तसेच संशोधनक्षेत्रातील आजचे यशवंत. आज दीक्षांत समारंभामध्ये

विद्यापीठातर्फे विविध विद्याशाखांमधील ४३९ संशोधकांना आचार्य(पीएच.डी) पदवी, एका संशोधकास मानवविज्ञान पंडित(डि. लिट.) पदवी , विविध परीक्षांतील गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्यांना १०५ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके, २४ रोख पारितोषिके तसेच ३६,७२२ विद्यार्थ्यांना पदवी व ४८ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आली. विद्यापीठातर्फे या वर्षी पहिल्यांदाच सुरक्षित स्वरूपातील टॅम्परप्रुफ पदवी वितरित करण्यात आली आहे.

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालये यांतून विविध शैक्षणिक विकासात्मक कामे प्रगतिपथावर आहेत. 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान(रुसा)'अंतर्गत विद्यापीठाने या वर्षी अंदाजे रु. १२१८कोटी एवढ्या रकमेचा संस्थात्मक विकास प्रस्ताव (IDP) मुंबई येथील विभागीय कार्यालयास सादर केला. त्यापैकी १०७कोटींचा प्रस्ताव तत्त्वतः मान्य झाला आहे. या अंतर्गत प्रामुख्याने भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षण व संशोधन केंद्र, राज्यस्तरीय आदिवासी संशोधन केंद्र, शाश्वत विकास केंद्र यांची कार्यान्वयन तसेच पायाभूत सोयी-सुविधा, शैक्षणिक संसाधने, अध्यापकांचे प्रशिक्षण इत्यादींसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच संशोधनक्षेत्रातही विद्यापीठाची प्रगती सुरू असून विविध विभागांमधून संशोधनप्रकल्प राबविले जात आहेत. सद्यःस्थितीत विद्यापीठातील विभागांमधून सहा संशोधन प्रकल्प सुरू आहेत. या वर्षी जैवतंत्रज्ञान विभागास केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे(डी. एस. टी.) FIST programme 2018साठी ७८लक्ष रुपये मंजूर करण्यात आले तसेच प्राणिशास्त्र विभागास 'महिला संशोधक योजने'अंतर्गत केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे(डी. एस. टी.) २८लक्ष रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले.

या वर्षी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाने 'एअरोबायोलॉजी' या विषयावर राष्ट्रीय परिषद, भूगर्भशास्त्र विभागाने इंडियन असोसिएशन ऑफ सेडिमेंटॉलॉजीस्ट संस्थेचे ३४वे अधिवेशन व राष्ट्रीय परिषद, मराठी विभागाने साहित्य अकादेमीच्या सहकार्याने 'आधुनिक मराठी साहित्यावर लोकसाहित्याचा परिणाम' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र तसेच राष्ट्रीय पातळीवरील फिल्म ॲंड टेलेव्हिजन इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने 'फिल्म ॲप्रिसिएशन कोर्स'चे आयोजन केले. 'एफ. टी. आय. आय.'च्या अभ्यासक्रमाचे अमरावती येथे पहिल्यांदाच आयोजन झाले. या उपक्रमामुळे चित्रपट क्षेत्राकडे वळू इच्छिणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळाले असून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आजीवन अध्ययन, मूल्यशिक्षण आणि जीवन कौशल्य विकास या विषयावर राष्ट्रीय

कार्यशाळेचे तसेच विभागीय महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. महारोजगार मेळाव्यात ४५०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती व त्यांपैकी १००० विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झाले. हे या मेळाव्याचे मोठेच यश म्हणावे लागेल. याव्यतिरिक्त विधी विभाग, गणित विभाग या विभागांनी अनुक्रमे 'कायदेविषयक जनजागृती शिबिर', 'नेट-सेट कार्यशाळा' या उपक्रमांचे आयोजन केले. संलग्नित महाविद्यालयांतर्फेदेखील विविध विषयांवर चर्चासत्र-परिषदांचे आयोजन करण्यात आले.

शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत मागील वर्षी विद्यापीठाने 'मराठी भाषा गौरव दिना'चा कार्यक्रम भव्य प्रमाणात साजरा केला होता व त्यात विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध संस्था, महाविद्यालये, मराठी प्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांविषयी आदर व अभिमान व्यक्त करण्यासाठी या वर्षीदेखील विद्यापीठाने 'मराठी भाषा गौरव दिना'चे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले आहे.

विद्यापीठाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत या वर्षी 'व्हर्च्युअल सी फोर' या केंद्राचे कार्यान्वयन केले. या केंद्राचे उद्‌घाटन मा. शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते पार पडले. 'व्हर्च्युअल सी फोर सेंटर : ज्ञानाचे एक नवे दालन ....आपणापर्यंत!' या उपक्रमाद्वारे संलग्नित महाविद्यालयांच्या ठिकाणी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करून किंवा पुनर्प्रक्षेपणाच्या साहाय्याने विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा समाजाला लाभ घडवून देण्यात येईल. या केंद्राद्वारे अमरावती परिक्षेत्रातील सामाजिक किंवा तत्सम समस्या सोडविण्यासाठी हातभार लागू शकेल. विद्यापीठ व महाविद्यालय, विद्यापीठ व समाज विकासासाठी एकत्र येऊ शकतील आणि या विद्यापीठाला खऱ्या अर्थाने संत गाडगे बाबांच्या कल्पनेतील 'लोकविद्यापीठा'चे स्वरूप प्राप्त होईल.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना या वर्षी विविध मानसन्मान प्राप्त झाले. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख यांना राष्ट्रीय स्तरावरील संस्थेचे फेलो म्हणून सन्मान मिळाला. विद्यापीठातील काही विभागातील प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय प्रकल्प, चर्चासत्र परिषदांतून सहभागी होत विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला.

राहुरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठात संपन्न झालेल्या १२व्या 'आविष्कार' स्पर्धेत विद्यापीठ चमूतील तीन विद्यार्थ्यांनी प्रथम स्थान पटकावले. तर 'कृषी आणि पशुसंवर्धन' या

गटात विद्यापीठाला फिरता चषक प्राप्त झाला.

विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये सलग या वर्षीदेखील विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सप्टेंबर २०१७मध्ये जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. AISECT विद्यापीठ, भोपाळ येथे नोव्हेंबर २०१७मध्ये संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत विद्यापीठ चमूने भारतीय समूहगान आणि फोक ऑर्केस्ट्रॉ या प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावला. शास्त्रीय गायन, एकांकिका आणि फाईन आर्ट (कोलाज) या प्रकारांत द्वितीय क्रमांक तर पाश्चात्त्य समूहगान आणि मिमिक्री या प्रकारांत तृतीय क्रमांक प्राप्त केला. यशस्वी चमू-स्पर्धक रांची विद्यापीठ, रांची येथे अखिल भारतीय स्पर्धेत सहभागी झालेत.

विविध कलास्पर्धांप्रमाणेच क्रीडास्पर्धांमध्येदेखील विद्यापीठ चमूंनी उत्तम कामगिरी केली आहे. भुवनेश्वर येथील के. आय. आय. टी. विद्यापीठात डिसेंबर २०१७मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ धनुर्विद्या स्पर्धेत विद्यापीठाच्या चमूने रिकव्हर (मुले) व भारतीय गटात प्रथम स्थान पटकावले. नोव्हेंबर २०१७मध्ये चंदीगड येथील पंजाब विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सींग स्पर्धेत एका विद्यार्थिनीने सुवर्णपदक तर डिसेंबर २०१७मध्ये मोहाली येथील चंदीगड विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ भारतोलन स्पर्धेत एका विद्यार्थिनीने कास्यपदक प्राप्त केले. तसेच एकविसाव्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'अश्वमेध' क्रीडा महोत्सव २०१७या स्पर्धेत विद्यापीठाने व्हॉलीबॉल(मुले), कबड्डी (मुली) आणि खो-खो(मुली या प्रकारांमध्ये तृतीय स्थान पटकावले. नेहमीप्रमाणे याही वर्षी विद्यापीठातर्फे २०१६-२०१७या सत्रासाठी उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.

या वर्षी नागपूर येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद पटकावले.

सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी विद्यापीठातर्फे उपयोजित कौशल्य वर्गांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सूत्रसंचालन, भाषण कौशल्य, स्पोकन इंग्लिश, गट चर्चा, मुलाखत तंत्र या प्रशिक्षण वर्गांचा समावेश आहे. 'लाईफ कोपिंग स्कील्स'अंतर्गत सांघिक कार्य

(टीम वर्क) या विषयावर विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. याशिवाय आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातर्फे यावर्षी विविध विषयांतील रोजगारक्षम अकरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. व्यावसायिक जगात सक्षमपणे उभे राहण्यासाठी या उपक्रमांचा विद्यार्थ्यांना लाभ होत आहे.

विचारांचे आदानप्रदान, प्रशिक्षण, संशोधन साहाय्य इत्यादींसाठी विद्यापीठाने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार केलेले असून या वर्षी 'एक भारत श्रेष्ठ भारत' या केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत सांस्कृतिक ज्ञान, विचार, कला-कौशल्ये यांच्या आदानप्रदानासाठी ओरिसा या राज्यातील विद्यापीठाशी सामंज्यस्य करार प्रगतिपथावर आहे.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन, अध्यापन या बाबींकडे लक्ष पुरविणाऱ्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांची तरतूद केली आहे. या योजनांमध्ये प्रामुख्याने विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना, संत गाडगे बाबा ग्रामीण विद्यार्थिनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना यांचा समावेश आहे. या योजनांमध्ये संत गाडगे बाबा कमवा आणि शिका या वैशिष्ट्यपूर्ण योजनेचादेखील समावेश आहे. कमवा आणि शिका योजनेसाठी या वर्षी एकूण ९७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यात संलग्नित महाविद्यालयांतील ५२ विद्यार्थी तर विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांतील ४५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या योजनेद्वारा विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन आणि श्रममूल्य रुजविण्यास मदत होईल.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, रक्तदान, जलव्यवस्थापन व जलसंधारण, एड्स जनजागृती, ग्रामीण बेरोजगार युवक जनजागृती, रस्ता सुरक्षा अभियान इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आलेत. दि. २१ जून २०१७रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला. विविध राज्यस्तरीय कार्यशाळा, शिबिरे यांतून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

दि. २० डिसेंबर २०१७रोजी 'पर्यावरण पुरस्कार २०१७' तसेच 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१७' यांचे विद्यापीठातर्फे वितरण करण्यात आले.

विद्यापीठास समृद्ध असे ग्रंथालय लाभले आहे. 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६' नुसार त्याचे नामकरण आता 'ज्ञानस्त्रोत केंद्र' असे झाले आहे. या केंद्रात १,१४,७१३ ग्रंथ,

१२६६इ-बुक्स, २९७५ आचार्य पदवी प्रबंध, ४३५४३ डेझर्टेशन्स, १८८ नियतकालिके, पंधरा हजारपेक्षा जास्त  इ-जर्नल्स, दहा ऑनलाईन डेटा बेसेस इत्यादी ज्ञानसंपदा उपलब्ध आहे. 'ज्ञानस्रोत केंद्रा'द्वारे पोर्टलमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले ProQuest Science Journal, LISA, ABI/INFORM, Science Online, Indiastat, Manupatra, Scopus इ. डाटाबेसेस संशोधकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. विविध सुविधांमध्ये बुक बॅक, लायब्ररी पोर्टल, इ-रिसोर्स ॲक्सेस सेंटर, वेब ओपॅक, रिमोट ॲक्सेस, फेडरेटेड सर्च, ॲंटी प्लॅगियारिझम व युवर अवेअरनेस प्रोग्रॅम यांचा समावेश आहे. दि. १५ ऑक्टोबर २०१७रोजी ग्रंथालयातर्फे 'वाचन प्रेरणा दिवस' साजरा करण्यात आला.

विद्यार्थी मित्रहो, आता काही महत्त्वाच्या बाबींविषयी मी आपणाशी संवाद साधू इच्छितोः
१) आपले विद्यापीठ हे शिक्षणाचे केंद्र आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, विद्यापीठ म्हणजे केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे केंद्र नव्हे. विद्यापीठ हे समाजासाठीदेखील आहे, युनिव्हर्सिटी फॉर कम्युनिटी. त्यामुळे समाजविकासात विद्यापीठाद्वारे हातभार लागणे आवश्यक आहे. संत गाडगे बाबांनी समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन वेचले. तेव्हा, आपले विद्यापीठ, समाजाबद्दल कळवळा असणारे गाडगे बाबांच्या कल्पनेतील 'लोकविद्यापीठ' व्हावे आणि त्यासाठी आपण प्रयत्नशील असावे.

२) आपल्या देशात आजही कित्येक समस्या आहेत. एकीकडे आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रगतीच्या यशोशिखराकडे भरधाव वेगाने जात आहोत तर दुसरीकडे आमच्या पायथ्याशी कित्येक समस्या उग्र झालेल्या आहेत. या समस्यांनी आपली व्यवस्था खिळखिळी होऊ पाहात आहे. या व्यवस्थांकडे दुर्लक्ष करून आपल्याला प्रगतीचे फळ चाखता येणार नाही.

३) आपल्या देशात किंबहुना आपल्या दूरस्थ भागात आजही कुमारी मातेचा प्रश्न आहे. ही मोठीच बिकट समस्या आहे. त्यामागची कारणेही विविध आहेत. पुरुषी शोषणाचा बळी ठरून कुमारी मातांचा प्रश्न उद्‌भवतो. अशा प्रश्नांची सोडवणूक मानवतापूर्ण, सहृदयी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. कुमारी मातांकडे समाजाने सहानुभूतीने पाहायला हवे. त्यांना सन्मानाची, वागणूक द्यायला हवी. "जीवा ऐसे देखिजे आणिक जीवासी" अशी संत तुकारामांची उक्तीच आहे. आपणाप्रमाणे इतरांना पाहावे, त्याप्रमाणे आपले वर्तन असले पाहिजे.

४) मित्रहो, वैयक्तिक विकासाबरोबरच आपण समाजाचा पर्यायाने देशाचा विकास घडवावा. त्यासाठी सार्वजनिक जीवन जगले पाहिजे. सामाजिक उपक्रमांमध्ये आपला सहभाग वाढविला पाहिजे. 'सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग' हे जीवनाचे उच्चतम मूल्य मानले पाहिजे. फेसबुक, व्हॉट् ॲपच्या कृतक सामाजिकतेकडून आपण खऱ्या सामाजिकतेकडे वळण्याची आवश्यकता आहे.

५) आपण जगातल्या एका मोठ्या लोकशाही व्यवस्थेचे घटक आहोत. तेव्हा सुजाण नागरिक, विवेकी मतदार होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मतदारांच्या विवेकपूर्ण वर्तनासाठी आपण लोकशिक्षणाची चळवळ राबविली पाहिजे.

६) आपल्या देशात आता मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे. शाळा, महाविद्यालयांतून शिक्षण घेऊन मुलींनी जीवनाच्या विविध क्षेत्रात पुढे गेले पाहिजे. कमला सोहोनी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स इत्यादी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील कर्तृत्त्ववान महिला, लता मंगेशकर, एम. एस. सुब्बलक्ष्मी या कला क्षेत्रातील श्रेष्ठ महिला तसेच कर्नाम मल्लेश्वरी, सायना नेहवाल, मेरी कोम, साक्षी मलिक, पी. व्हि. सिंधू या क्रीडा क्षेत्रातील यशवंत महिलांप्रमाणे उद्योग क्षेत्रातही महिलांनी पुढे गेले पाहिजे. गेले काही वर्षे उद्योग क्षेत्रातही महिला पुढे दिसत आहेत. भारतातील प्रमुख काही बँकांच्या तसेच उद्योग समूहांच्या अध्यक्ष, मुख्य संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी पदांवर महिला स्त्रिया होत्या. ही परिवर्तनाची नांदीच म्हणायला हवी. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन उद्योग क्षेत्रात नवे काही करण्यासाठी आजच्या विद्यार्थिनींना प्रेरणा मिळो. आपल्यातून काही महिला उद्योजिका देशाला मिळाल्या तर मला विशेष आनंद होईल.

७) विद्यार्थी मित्रहो, जीवनात सतत प्रगती करा. आनंदी रहा. शाश्वत मूल्यांची जोपासना करा. संत गाडगे बाबांच्या करुणामय जीवनातून आपणाला अखंड प्रेरणा मिळत राहो. रवींद्रनाथ टागोरांच्या उक्तीप्रमाणे,

**"भयशून्य चित्त जेथ, सदैव उन्नत माथा**

**मुक्त अशा स्वर्गातच होवो, मम जागृत देश आता"**

भयशून्य चित्ताच्या तसेच बुद्धीच्या नवसर्जनाला वाव देणाऱ्या, मुक्त विचारांच्या भारताची उभारणी करण्यासाठी तुम्हाला प्रेरणा मिळो, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो. पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**धन्यवाद !**
**जय हिंद, जय महाराष्ट्र !**